महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ ■

## नागपूर मनपा सार्वत्रिक निवडणूक

# मतदान व मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान व मतमोजणीची तयारी पूर्ण झाल्याची माहिती आज (१२ जानेवारी २०२६) आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. शहरातील ३८ प्रभागांमध्ये होणाऱ्या या निवडणुकीसाठी प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून सुरक्षित, पारदर्शक आणि सुरळीत मतदान प्रक्रिया पार पाडण्यावर भर देण्यात आला आहे.



शहरात एकूण ३८ प्रभाग असून त्यामध्ये ३७ चार-सदस्यीय व १ तीन-सदस्यीय प्रभाग आहे. या निवडणुकीतून एकूण १५१ नगरसेवक निवडले जाणार आहेत. महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होईल. या निवडणुकीसाठी नागपूर शहरात एकूण २४,८३,११२ मतदार नोंदणीकृत आहेत.

त्यामध्ये १२,२६,६९० पुरुष, १२,५६,१६६ महिला आणि २५६ इतर मतदारांचा समावेश आहे.शहरात एकूण ३,००४ मतदान केंद्रे असून ती १,६४४ मतदान इमारतींमध्ये स्थापन करण्यात आली आहेत.

यापैकी ३२१ अतिसंवेदनशील व २९३ संवेदनशील मतदान केंद्रे असून तेथे विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मतदान पथक व सुरक्षा- मतदान प्रक्रियेसाठी ३,५७९ केंद्राध्यक्ष,१०,७३७ मतदान अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर एक पोलिस किंवा होमगार्ड कर्मचारी तैनात असेल. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रिया आणि एश्ट हाताळणीचे दोन टप्प्यांत प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय २४४ झोनल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी रॅम्प, फर्निचर, पिण्याचे पाणी, व्हीलचेअर, प्रथमोपचार किट आदी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

मतदान पथक व साहित्य वाहतुकीसाठी नागपूर महानगरपालिकेकडून विशेष व्यवस्था करण्यात आली असून यासाठी सुमारे ५०४ मनपा बसेस वापरण्यात येणार आहेत. झोननिहाय मतदानासाठी एश्ट कमिशनिंग पूर्ण झाले असून उपलब्ध यंत्रांची संख्या पुढीलप्रमाणे आहे मतदारांना नाव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे Voter App वापरता येणार आहे. तसेच मतदार पावती घरोघरी वितरित करण्यात येत असून, नाव शोधण्यासाठी मतदार सहाय्यता केंद्रेही स्थापन करण्यात येणार आहेत.

मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी SVEEP उपक्रमांअंतर्गत सायकल रॅली, बाईक रॅली, सेल्फी पॉइंट, बलून फेस्टिव्हल, रांगोळी स्पर्धा आदी विविध जनजागृती मोहिमा राबविण्यात येत आहेत.

### आदर्श आचारसंहिता व पथके

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असून FST - ६०, SST - ५७, VST - ४०, VVT - १० पथके कार्यरत आहेत. याशिवाय राजकीय पक्षांसोबत १८ डिसेंबर २०२५ व ५ जानेवारी २०२६ रोजी बैठकाही घेण्यात आल्या. शहरातील २५५ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. मतमोजणीसाठी १० मतमोजणी केंद्रे निश्चित करण्यात आली असून प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर २० EVM टेबल व ४ पोस्टल बॅलेट टेबल असतील.

# ट्रॅव्हल्स बसने दोघांना उडवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

ट्रॅव्हल्स बसच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून मोटारसायकलस्वार आणि सायकलस्वाराला जबर धडक दिली. यात मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला, तर सायकलस्वार जखमी आहे. अपघाताची ही घटना नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. जुनैद अजीज गोरेपठाण (२०) रा. तंबाखू ओळ, कामठी असे मृताचे नाव आहे. जखमी मारोती गोमा आटनकर (५८) रा. कांद्री, कन्हान यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी बस चालकाला अटक केली आहे. मयूर साहेबराव पांडे (२६) रा. अमरावती असे अटकेतील चालकाचे नाव आहे.

सोमवारी सकाळी ७.२० वाजताच्या सुमारास जुनैद त्याच्या एमएच-४०/डीडी-४५३२ क्रमांकाच्या मोटारसायकलने काही कामानिमित्त जयभीम चौकात जात होता. सफर इंटरप्रायजेससमोर बस चालक मयूर याने निष्काळजीपणे वाहन चालवत जुनैदच्या मोटारसायकलला जबर धडक दिली. याच दरम्यान सायकलस्वार मारोती हा सुद्धा बसच्या कचाट्यात सापडला. दोघेही गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे देश एकसंघ



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार प्रदान करताना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

### भूषण गवई यांचे प्रतिपादन

स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा सर्वार्थाने अंगिकार करणारे आणि ही मूल्ये रुजविणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारत देश अनेक संकटातून तरला आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या सत्तर वर्षांनंतरही एक संघ राहू शकला. देशाच्या आजूबाजूला अनेक देशांमध्ये त्यांच्या संविधानात स्थित्यंतरे घडली पण भारतीय संविधानात त्या त्या काळाच्या परिस्थितीनुसार कलमांमध्ये बदल करून हे संविधान अधिक व्यापक आणि न्यायकारक ठरले आहे. असे प्रतिपादन माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मारवाडी फाउंडेशनद्वारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. 2025 चा हा पुरस्कार प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट व वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरॉलॉजीचे विश्वस्त पद्मश्री डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांना भूषण गवई यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी न्यायमूर्ती विजय डागा यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराडचे प्रमुख सल्लागार डॉ.वेदप्रकाश मिश्रा, माजी न्यायमूर्ती विकास शिरपूरकर, न्यायमूर्ती अनिल किलोर, डॉ.गिरीश गांधी उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप पाच लक्ष रुपये, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे होते.

यावेळी विजय डागा आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, ज्या समाजाने आपल्या कर्तृत्व कौशल्याने आपली ओळख देशातच नाही तर जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये निर्माण केली आहे, असा समाज स्वतः प्रतिभा संपन्न असून सुद्धा इतर समाजातील प्रतिभावंतांना गौरविण्यात सरसावला आहे. मारवाडी फाउंडेशनची स्थापना करून केवळ दलित समाजातच नाही तर विविध क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन कार्य करणाऱ्या विविध प्रतिभावंतांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार 2018 पासून दिल्या जात आहे ही प्रशंसीय गोष्ट आहे. डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांनी आपल्या वैद्यकीय व्यवसायामध्ये एक मोठी उंची गाठली आहे. रुग्णाला केंद्रबिंदू मानून,प्रथम प्राधान्य देऊन मानवीय दृष्टिकोनातून त्यांच्याकडून केली जाणारी रुग्णसेवा वैद्यकीय तत्त्वज्ञानाचे तेजस्वी प्रतीक आहे असे ते म्हणाले. आपल्या रुग्णसेवेतून त्यांनी केवळ शरीरालाच नाही तर मनालाही स्पर्श केला आहे.

यावेळी न्यायमूर्ती अनिल किलोर हे म्हणाले की, आजचे तरुण जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी अनेक व्यक्तिमत्व विकासाची पुस्तके वाचत असतात पण त्या तरुणांनी डॉ.चंद्रशेखर मेश्राम या यशस्वी व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करावा असे मार्गदर्शन त्यांनी आपल्या भाषणात केले. भारतरत्न विजय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार आज पद्मश्री चंद्रशेखर मेश्राम यांनी दिल्या जात आहे याचा मला विशेष आनंद होत आहे असे ते म्हणाले.

यावेळी डॉ. गिरीश गांधी यांनी प्रस्ताविक भाषणात संवेदना व्यक्त केली की महापुरुषांना जातीय वादामध्ये अडकवून माणसांमध्ये आज दरी निर्माण होत आहे ही राष्ट्रीय एकात्मतेला फारच घातक गोष्ट आहे. तेव्हा ही दरी कमी करण्यासाठी केवळ दलित समाजातच नाही तर विविध समाजातील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार दिल्या जात आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉक्टर चंद्रशेखर मेश्राम म्हणाले की दुर्लक्षित वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी ज्यांनी भरीव योगदान दिले आणि ज्यांच्यामुळे मी इथपर्यंत येऊन पोहोचला आहे त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने मिळालेला पुरस्कार इतर सर्व पुरस्कारांपेक्षा लाखमोलाचा आहे. हा पुरस्कार मिळण्यामध्ये माझे सोबती, कुटुंब, सहकर्मचारी यांचे मोठे योगदान असून मी कृतज्ञ आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले तर कार्यक्रमाला सभागृहात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.






